# आद्यशंकराचार्यकृत प्रश्नोत्तरी

श्रीमत् आद्य शंकराचार्यांचा प्रश्नोत्तरी या नावाचा बत्तीस श्लोकांचा एक छोटा ग्रंथ प्रसिद्ध आहे. नेमके आध्यात्मिक साधनेच्या दृष्टीने विचारलेले प्रश्न व त्यांना दिलेली चपखल उत्तरे असे त्याचे स्वरूप आहे. अत्यंत जलद न्यायदानाच्या (Summary Trial) प्रसंगी जी पद्धत वापरली जाते तीच येथे दिसते. यावर शान्तपणे विचार केला असता नीती, धर्म, साधना व अध्यात्म यांचा संतुलित विचार केल्याचे लक्षात येईल.

(१)

**अपारसंसारसमुद्रमध्ये**
**संमज्जतो मे शरणं किमस्ति ।**
**गुरो कृपालो कृपया वदैत-**
**द्विश्वेशपादाम्बुजदीर्घनौका ॥१॥**

प्रश्न – हे कृपाळू गुरुदेवा ! कृपा करून सांगा की या अपार संसारसमुद्रात बुडणाऱ्या मला कोणाचा आधार आहे ?

उत्तर – जगदीशाच्या पदकमलरूप विस्तीर्ण नौकेचा.

हा गुरुशिष्यांचा संवाद आहे. या प्रश्नावरून हा शिष्य आर्तजिज्ञासू असावा असे दिसते. संसारसमुद्रातील खारे पाणी नाकातोंडात गेल्याने हा गुदमरलेला आहे. सत्ता, संपत्ती, यश, भोग, कीर्ती इत्यादी कागदी नौका जाड जाड पुठ्ठ्याच्या असल्या तरी भिजलेल्या व आत पाणी भरलेल्या दिसतात. त्या समुद्राच्या पैलतीरी नेऊ शकणार नाहीत हे त्याने जाणले आहे. त्याचबरोबर त्याला ठाऊक आहे की पार नेण्यासारखी नौका मिळवून देणारे महात्मे या सागरात आहेत. ते पैलतीरी जाऊन बुडणाऱ्यांना मदत करण्यासाठी माघारी फिरले आहेत. ते महात्मे ज्या आधाराने पैलपार गेले तीच नौका कुणाही बुडणाऱ्याच्या स्वाधीन करण्यास ते आतुर आहेत. 'उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत' या ललकारीचा संस्कार त्या शिष्याच्या बुद्धीवर झालेला आहे. 'योऽस्माकमविद्यायाः परं पारं तारयसि' ही गुरुस्तुती त्याने वारंवार ऐकली आहे. स्वतःच्या व्यावहारिक दृष्ट्या भक्कम असणाऱ्या बाहूंच्या बळावरील त्याचा विश्वास उडाला आहे. असे बाहू 'अविद्यया मृत्युं तीर्त्वा' या रीतीने केवळ देहजीवन तरून जाण्यास समर्थ असतात. अनादि-सान्त मायाजीवन त्याने पार करता येणार नाही. 'तमेवैकं जानथ', 'अमृतस्यैष सेतुः' (तोच एक जाणून घे, हे मायाजीवन पार करून नेणारा तोच अमृताचा पूल आहे) हे त्या शिष्याने ऐकले होते. असा शिष्य परिपूर्ण गुरुभाव धरून जेव्हा 'शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्' असे म्हणून शरण येतो तेव्हा त्याला श्रीगुरू उत्तरही तितक्याच निष्ठेने देतात. भगवत्चरण ही नौका चांगली लांबरुंद असून तीच त्याला योग्य असल्याचे तात्काळ उत्तर ते देतात. चरण हा शब्द सगुणवाचक आहे. त्याचप्रमाणे चरण म्हणजे अधिष्ठान अशा अर्थाने तो निर्गुणवाचकही आहे. 'आतां कोठे धावे मन । तुझे चरण देखलीया' ही तुकोक्ती अशीच उभयवाचक आहे. सगुणाचा आधार दोन प्रकारचा आहे. ईश्वर न्यायी असून त्याचे अनुशासन सर्व विश्वावर चालत असल्याने मी ज्या परिस्थितीत आहे ती त्यानुसार असलीच पाहिजे. हा ईश्वरतत्त्वाचा पहिला समाधान देणारा आधार आहे. सगुणाचे चरित्र, नाम, भजन, पूजन, इत्यादिप्रकारे त्याचा भावनिक आधार मोठांच आनंददायक असतो. निर्गुणाच्या दृष्टीने ब्रह्माच्या अधिष्ठानावर जगत अध्यस्त असल्याने त्यातील सर्व घडामोडी मिथ्या ठरतात. वैराग्य व अखंड समाधान हे त्याचे फल आहे. या चरणकमलांच्या आधाराने संसारसागर तरून जाता येतो.

(२)

**बद्धो हि को यो विषयानुरागी**
**का वा विमुक्तिर्विषये विरक्तिः ।**
**को वास्ति घोरो नरकः स्वदेहः**
**तृष्णाक्षयः स्वर्गपदं किमस्ति ॥२॥**

प्रश्न – खरा बद्ध कोण ?
उत्तर – विषयांवर प्रेम करणारा विषयासक्त.
प्रश्न – खरी मुक्ती कशात आहे ?
उत्तर – विषयांच्या वैराग्यात.
प्रश्न – भयंकर नरक कोठे आहे ?
उत्तर – आपल्या शरीरात.
प्रश्न – स्वर्गप्राप्ती म्हणजे काय ?
उत्तर – तृष्णानाश होणे.

'विषय' हा शब्द 'विञ् बन्धने' अशा व्युत्पत्तीने प्रसिद्ध आहे. म्हणजे बंधन हेच त्याचे स्वरूप आहे. 'विषिन्वति इति विषयः' ही व्याख्या जो जखडून टाकतो, खिळवून ठेवतो तो विषय असा त्याचा अर्थ सांगते. संभोग हा सर्वात बलवान विषय (स्पर्श) असल्याने सामान्यतः विषय शब्दाचा तोच अर्थ रूढ आहे. पण येथे शब्द, रूप, रस व गंध हे सुद्धा विषय अभिप्रेत आहेत. जो विषय अत्यंत प्रिय असतो तो जखडून टाकतो व तेच त्याचे बंधन असते. आचार्यांनी दिलेले उत्तर किती चपखल आहे हे यावरून कळते. पारंपारिक वेदान्ताची सरणी येथे बाजूला ठेवून बद्धाची व्याख्या साधनाशी सुसंगत सांगितली आहे. बंधन काल्पनिक आहे किंवा बंधन मुळात नाहीच असे उत्तर येथे दिलेले नाही. पुढचा प्रश्न व त्याचे उत्तर पहिल्या प्रश्नाचाच उत्तरार्ध आहे. स्वर्ग व नरक यासंबंधी येथे दिलेले उत्तर आधुनिक विचारांशी अत्यंत, मिळतेजुळते आहे. पूर्वमीमांसेचा स्वर्ग व नरक येथे नाकारले आहेत. या किंवा पुढल्या शरीरात जन्म घेणे हाच नरक! "नर्काचे कोठार भरले । आंत बाहेरी लिडबिडिले। मूत्र पोतडे जमले । दुर्गंधीचे ॥" (दासबोध ३–१–१८) या ओवीत नर्कातील घाणीचा निर्देश आहे. "मग ते खांडून काढिती । हस्तपाद्र छेदून घेती । हातां पडिले तेचि कापिती । मुख नासिक उदर ॥" (३–१–४१) जन्मकाळी होणाऱ्या नरकयातना येथे सूचित केल्या आहेत.

स्वर्ग हा तेथील दिव्य सुखांसाठी प्रसिद्ध आहे. या पृथ्वीवरील भोग अगदीच सामान्य असतात. भोगासक्ताला स्वर्गभोगाची अभिलाषा निर्माण होणे स्वाभाविक आहे. यम नचिकेताला म्हणतो –

**ये ये कामा दुर्लभा मर्त्यलोके**
**सर्वान् कामान् छन्दतः प्रार्थयस्व ।**
**इमा रामाः सरथाः सतुर्या ।**
**न हीदृशा लंभनीया मनुष्यैः ॥**

(कठ १–१–२५)

– जे जे भोग या मनुष्यलोकात दुर्लभ आहेत ते ते अगदी हवे तसे मागून घे. या वाहनावर आरूढ झालेल्या व वाद्यवादनात निपुण असलेल्या रमणी तू मागून घे. त्या माणसांना कधीच मिळत नाहीत.

यावर नचिकेताने दिलेले उत्तर पृथ्वीवरील व स्वर्गातील सर्व भोगांना सारखेच लागू आहे. तो म्हणतो –

**श्वोभावाः मर्त्यस्य यदन्तकैतत्**
**सर्वेन्द्रियाणां जरयन्ति तेजः ।**

– हे क्षणभंगुर (अनित्य) भोग माणसाच्या सर्व इंद्रियांना निस्तेज करून टाकतात.

पृथ्वी व स्वर्ग आणि त्यांत राहणारी माणसे व देव ही सर्व नाश पावणारी असल्याने निरर्थक आहेत. याउलट भोगाची अनिवार इच्छा (तृष्णा) जर विवेकाने नाहीशी केली तर असे निरिच्छ जीवन हाच स्वर्ग होय. सर्व संतांनी स्वर्गसुख हे तुच्छ मानून स्वर्ग या संकल्पनेचीच जवळपास हकालपट्टी केली आहे.

(३)

**संसारहृत्कः श्रुतिजात्मबोधः**
**को मोक्षहेतुः कथितः स एव।**
**द्वारं किमेकं नरकस्य नारी**
**का स्वर्गदा प्राणभृतामहिंसा ॥३॥**

प्रश्न – संसार कशाने जिंकला जातो ?
उत्तर – उपनिषदातील आत्मबोधाने.
प्रश्न – मोक्ष कशामुळे मिळतो ?
उत्तर – त्याच आत्मबोधाने.
प्रश्न – नरकाचे मुख्य दार कोणते ?
उत्तर – स्त्रीची अभिलाषा (पुरुषाची अभिलाषा).
प्रश्न – स्वर्ग कशाने मिळतो ?
उत्तर – सर्व प्राण्यांच्या अहिंसेने.

संसार जिंकणे व जग जिकणे यात फरक आहे. जग सैन्यबळावर जिंकले जाते. सरत जाणाऱ्या संसाराचे अनित्यत्व ओळखून त्यावरील आसक्ती सोडणे याला संसार जिंकणे असे म्हणतात. 'साचचि बोलाचे नव्हे शास्त्र संसार जिणे ते शस्त्र ।' असे संत ज्ञानदेव गीतेचे वर्णन करितात. ईशावास्य सांगते – "ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्।" संसार जिंकण्याचे हे उपनिषदाचे तत्त्वज्ञान आहे. सर्व संसाररूपी जग ब्रह्माने आच्छादलेले आहे. हेच आच्छादन अनुभवून बघण्याची सवय झाली की जग जिंकले जाते. पण त्यासाठी युद्धही तसेच करावे लागते.

**यदिच्छसि वशीकर्तुं जगदेकेन कर्मणा ।**
**सुदुर्दमेन्द्रियग्रामं सर्वत्र वशमानय ॥** (तैत्तिरीय.)

– कोणा एकाच कृतीने जर जग जिकावयाचे असेल तर जिंकण्यास महाकठीण असलेल्या इंद्रियांना पावालोपावली नियंत्रणाखाली ठेव.

**यस्मिन् द्यौः पृथिवी चान्तरिक्ष-**
**मोतं मनः सह प्राणैश्च सर्वैः**
**तमेवैकं जानथ आत्मानम्** । (मुंडक २—२—५)

— ज्यामध्ये स्वर्ग, पृथ्वी, आकाश, प्राण, मन हे सर्व सामावलेले आहेत तोच एक आत्मा जाण.

हा आत्मा जाणला की संसार जिंकला जातो. म्हणजे त्यावरील 'तो सत्य आहे' हा समज जातो व आसक्ती नष्ट होते. त्याचबरोबर जीवात्मा ब्रह्मरूप आहे हे ज्याने अनुभवाने जाणले आहे त्याला मोक्ष मिळतो. हे सुद्धा उपनिषदांच्या उपदेशाप्रमाणेच जाणावे लागते.

**यथोदकं शुद्धे शुद्धमासिक्तं तादृगेव भवति ।**
**एवं मुनेर्विजानत आत्मा भवति गौतम ॥**
(कठ २—१—१५)

— ज्याप्रमाणे शुद्ध पाणी शुद्ध पाण्यात मिसळल्यावर दोन्ही एकरूप होतात त्याप्रमाणे मनन करणाऱ्याचा आत्मा ब्रह्मरूप होतो.

हेच खरे मोक्षाचे स्वरूप आहे. नंतर पुन्हा स्वर्ग नरक या संकल्पना मांडून त्यांचे स्वरूप अगदी वेगळ्या रीतीने येथे सांगितले आहे. स्त्री किंवा पुरुष ही स्वरूपाने नरकाची दारे नसतात. यासंबंधी भगवद्गीतेतील 'ध्यायतो विषयान् पुंस ' ही घसरगुंडी लक्षात आणावी. संसार जिंकण्याच्या संदर्भात स्वर्ग-नरकाची ही मांडणी लक्षात घेणे जरूर आहे. साधक साधनारूढ राहावा हा त्यातील मुख्य हेतू स्पष्ट दिसतो. स्त्री-पुरुषाचे कामपूर्तीच्या उद्देशाने केलेले चिंतन हे साधनेपासून विचलित करते — केवळ त्यांचे अस्तित्व नव्हे. हे चिंतन सहज स्वभावाशी झगडूनच थांबवावे लागते व हे करताना त्या चिंतनाला वेगळी दिशा विवेकपूर्वक द्यावी लागते. हे मोठ्या शूराचे काम आहे. म्हटलेच आहे की —

**बलेन परराष्ट्राणि गृह्णञ्छूरस्तु नोच्यते ।**
**जितो येनेन्द्रियग्रामः स शूर इति कथ्यते ॥**

— सामर्थ्याने दुसरे देश जिंकणाऱ्याला शूर म्हणत नाहीत. ज्याने सर्व इंद्रिये जिंकली आहेत त्याला शूर म्हणतात.

हे शौर्य नसेल तर ब्रह्मानुभव येत नाही व पुन्हा जन्म घ्यावा लागतो. हाच नरक. येथे स्वर्गाविषयी अगदी वेगळी कल्पना मांडली आहे. अहिंसा हाच स्वर्ग! शरीराची व मनाची हिंसा साधकाने करू नये. सर्वांमध्ये स्वतःला व स्वतःमध्ये सर्वांना पाहावयास त्याने शिकावयाचे असते.

**यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति ।**
**सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते ॥** (ईश. ६)

घृणा किंवा स्वार्थ या दोन्ही वृत्तींनाही ईशावास्य वृत्ती छेद देते. अशा रीतीने पापनाश झाल्यावर स्वर्गरूप आत्मप्राप्तीशिवाय दुसरे कोणते फळ मिळेल ? वेगळ्या संदर्भात हाच विषय 'केन'मध्ये आहे —

**'यो वा एतामेवं वेदापहत्य पाप्मानमनन्ते स्वर्गे लोके ज्येये प्रतितिष्ठति प्रतितिष्ठति ॥'** (केन ४-९)

— जो कोणी हे ज्ञान जाणून पापाचा नाश करील तो आत्मस्वरूपात स्थिर होतो. स्थिर होतो.

ब्रह्मविषयक मूळ प्रश्न असल्याने (उपक्रम) उत्तर ब्रह्मविषयक मानले पाहिजे. म्हणून येथे 'स्वर्ग' शब्दाचा 'सर्वश्रेष्ठ' असा अर्थ होतो. आणि सर्वश्रेष्ठ (महतो महीयान्) ब्रह्मच आहे.

(४)

**शेते सुखं कस्तु समाधिनिष्ठो**
**जागर्ति को वा सदसद्विवेकी ।**
**के शत्रवः सन्ति निजेन्द्रियाणि**
**तान्येव मित्राणि जितानि यानि ॥४॥**

प्रश्न — सुखाने कोण झोपतो ?
उत्तर — समाधीच्या अनुभवात रमणारा.
प्रश्न — जागा कोण असतो ?
उत्तर — सत् व असत् यांचा विवेक जाणणारा.
प्रश्न — शत्रू कोण आहेत ?
उत्तर — आपली इंद्रिये; पण तीच जर जिंकली तर मित्र बनतात.

गाढ झोप व समाधी यांतील साम्य व वैषम्य लक्षात घेतले म्हणजे या प्रश्नोत्तराचे रहस्य खुले होईल. मांडूक्य उप. म्हणते —

**यत्र सुप्तो न कञ्चन कामं कामयते न कञ्चन स्वप्नं पश्यति . . . एवानन्दमयो आनंदभुक् चेतोमुखः ॥५॥**

— झोपलेला कशाचीच इच्छा करीत नाही व स्वप्नसुद्धा पाहत नाही. असा तो आनंदमय, आनंदभोगी असतो.

जाबालदर्शनोपनिषद असंप्रज्ञात समाधीचे वर्णन करताना म्हणते —

**प्रशान्तवृत्तिकं चित्तं परमानंददायकं ।**
**असम्प्रज्ञातनामाऽयं समाधिर्योगिनां प्रियः ॥५४॥**

— चित्तवृत्ती अत्यंत शान्त झाल्याने तेथे परमानंद प्रगट होतो.

अन्तःकरणाची आत्यंतिक शांतता व आनंदानुभूती हे दोन्ही ठिकाणी साम्य आहे. परंतु गाढ झोपेत

अन्तःकरणवृत्ती घन अज्ञानात लीन होते व नकारात्मक आत्मानंदाचा अनुभव घेते. तो आत्मानुभव महावाक्यजन्य शाब्दी प्रमेने झालेला नसतो. त्यामुळे अविद्याग्रंथींचा छेद होत नाही. असंप्रज्ञात समाधीत जर लयचिंतनाच्या (कठ उप.) आधाराने आत्मानुभव प्रत्यक्ष झाला असेल तर तो प्रमाजन्य (गुरूपदेशात्मक) असल्याने तेथे अन्तःकरणवृत्ती आत्माकार झाल्याने होकारात्मक आनंदानुभव येतो. येथे अविद्यानिवृत्ती झालेली असते. आचार्यांनी येथे पारमार्थिक दृष्टीने उत्तर देऊन 'निद्रा' ही अवस्था वेगळ्या स्वरूपात मांडली आहे. तोच प्रकार त्यांनी जागृतीच्याही बाबतीत केला आहे. जागृतीची व्याख्या अशी –

**जागरितस्थानो बहिष्प्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः स्थूलभुक् ।** (मांडूक्य ३)

– दहा इंद्रिये, पांच प्राण व चित्तचतुष्टयाच्या आधाराने ईश्वररचित सृष्टीशी व्यापार करणारी जी जीवाची अवस्था तिला जागृती असे म्हणतात. या अवस्थेत ईश्वररचित सृष्टी, इंद्रियादी व्यापार व जीव या सर्वच गोष्टी अविद्या-अज्ञानमय आहेत. कारण –

"तैसा संसारू हा वीरा । रूख नाही साचोकारा ।
या उन्मूळणी दरारा । कासिया तरी ॥"

(ज्ञानेश्वरी अ. १५)

– हा संसारवृक्षच मुळात मिथ्या आहे. तो खरा वाटतो हे जे अज्ञान तीच निद्रा आहे. मग जागा कोण ? तर जो विवेकी असतो तो आत्मदृष्ट्या खरा जागा असतो. 'या निशा सर्वभूतानाम्' ही स्मृती प्रसिद्धच आहे. 'अदृष्ट, अव्यवहार्य, अग्राह्य, अलक्षण, अचिन्त्य, अनिर्देश्य, एकात्मप्रत्ययसार, प्रपंचोपशम व शान्त' असा आत्माच फक्त आहे असा ज्याचा कायमचा निश्चय झाला आहे तोच खरा जागा असतो.

आता आचार्य शत्रुमित्रविवेक सांगतात. व्यक्तीचा किंवा विश्वाचा या विवेकात समावेश नाही. साधनेच्या दृष्टीने मोकाट मन व इंद्रिये हीच वैरी आहेत.

**"यस्त्वविज्ञानवान् भवत्ययुक्तेन मनसा सदा ।**
**तस्येन्द्रियाण्यवश्यानि दुष्टाश्वा इव सारथे ॥"**

**(कठ १-३-५)**

– ज्याच्या बुद्धीत विवेक स्थिर झालेला नाही व ज्याने मन जिंकलेले नाही त्याची इंद्रिये बेसावधपणे रथ हाकणाऱ्या सारथ्याच्या हातातील दुष्ट घोड्यांप्रमाणे असतात. हे मन व घोडे साधकाचे शत्रू आहेत. पण –

**यस्तु विज्ञानवान् भवति युक्तेन मनसा सदा ।**
**तस्येन्द्रियाणि वश्यानि सदश्वा इव सारथेः ॥**

– ज्याच्या बुद्धीत विवेक स्थिर झाला आहे व मनावर पूर्ण नियंत्रण आहे त्याची इंद्रिये सावधपणे रथ हाकणाऱ्या सारथ्याच्या हातातील उत्तम घोड्यांप्रमाणे असतात. असे मन व घोडे साधकाचे मित्र होतात. 'विवेकी तोच खरा जागा असतो' या उत्तराच्या संदर्भात हा शत्रुमित्रविवेक पाहण्याची आवश्यकता आहे. या दोन प्रश्नोत्तरांतील सुसंगती व सातत्य साधकाने लक्षात घेणे निकडीचे आहे.

(५)

**को वा दरिद्रो हि विशालतृष्णः**
**श्रीमांश्च को यस्य समस्ततोषः ।**
**जीवन्मृतः कस्तु निरुद्यमो यः**
**किं वामृतं स्यात्सुखदा निराशा ॥५॥**

प्रश्न – दरिद्री कोण ?

उत्तर – अनिवार तृष्णा असणारा.

प्रश्न – श्रीमंत कोण ?

उत्तर – कोणत्याही परिस्थितीमध्ये संतुष्ट असणारा.

प्रश्न – जिवंत असून मेलेला कोण ?

उत्तर – जो पुरुषार्थरहित आहे तो.

प्रश्न – अमृत कशाला म्हणतात ?

उत्तर – आशारहित सुखद मनःस्थितीला.

नचिकेत यमाला म्हणतो–

श्वो भावा मर्त्यस्य यदन्तकैतत्
सर्वेन्द्रियाणां जरयन्ति तेजः ।
अपि सर्वजीवितमल्पमेव
तवैव वाहास्तव नृत्यगीते ॥(कठ १–१–२६)

हे यमदेवा! क्षणमात्र टिकणारे भोग मनुष्याच्या अन्तःकरणासह सर्व इंद्रियांना निस्तेज करतात. हे भोग कितीही भोगले तरी आयुष्य कमीच पडते. म्हणून भोगाची ही (रथ, रमणी इ.) सर्व साधने तुझ्यापाशीच राहू देत. लौकिक श्रीमंतीने भोगाची साधने मिळविता येतात. जितकी भोगाची तृष्णा जास्त तितकी त्यांच्या साधनांची गरज जास्त. साधनांची वाढती गरज भागविण्यासाठी संपत्तीची गरज जास्त. भोगाने भोगाची अपेक्षा जास्त! त्यामुळे असा श्रीमंत कधीच तृप्त न झाल्याने वास्तविक तो दरिद्रीच मानला पाहिजे. या भोगांसंबंधी वैराग्यशतक सांगते– 'भोगा न भुक्ता वयमेव भुक्ताः ।' – आम्ही भोगत नाही. तर भोगच आम्हाला भोगतात. तेच आम्हाला खाऊन टाकतात.

वास्तविक जो आत्मरूप खरा मी आहे त्याला कोणत्याच भोगांची गरज नसते व तो भोग भोगीतही नाही. 'संभोगप्राप्तिरिति चेन्न वैशेष्यात् ।''(ब्रह्मसूत्र १–२–८). जीवाहून कूटस्थ चैतन्य वेगळे असल्याने ते काहीच भोगीत नाही. जीवदशा लयाला जाऊन आत्मस्थितीला प्राप्त झाल्याखेरीज ही दरिद्रता जाणे शक्य नाही. दैवी संपदा हे दारिद्र्य नष्ट करण्यास मदत करते. 'दम' हा या दैवी संपदेचा घटक आहे. (गीता १६–१). त्याचे अनुष्ठान केले असता भोगासक्ती क्रमाने कमी होत जाते. याउलट –

कामान् यः कामयते मन्यमानः
स कामभिर्जायते तत्र तत्र ।
पर्याप्तकामस्य कृतात्मनस्त्वि-
हैव सर्वे प्रविलीयन्ति कामाः ॥ (मुंडक ३–२–२)

– कामामध्ये रममाण झालेल्याचा काम त्याला जिकडे घेऊन जातो तो त्या कामासारखाच होतो. पण ज्याच्या कामाला पूर्णविराम मिळाला आहे अशा शुद्धचित्त महात्म्याचा काम याच जीवनगंगेत विरून जातो. त्याची दरिद्रता नष्ट होते. जगात त्याच्यासारखा श्रीमंत कोणीच असत नाही. तैत्तिरीय उपनिषदात मनुष्य, मनुष्यगंधर्व, देवगंधर्व, पितर, अजानज देव, कर्मदेव इ. क्रमाने चढत्या श्रेणीचे आनंद सांगत सांगत त्या सर्वांहून आनंदी कोण असतो त्याचे उत्तर दिले आहे.

'श्रोत्रियस्य चाकामहतस्य' (तैत्तिरीय २–८) – वेदवेत्ता व कामनारहित महात्मा सर्वात आनंदी असतो. सतत संतुष्ट असतो. तोच खरा श्रीमंत! गीता सांगते–

विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः ।
निर्ममो निरहंकारः स शान्तिमधिगच्छति ॥
(२–७१)

– स्पृहाशून्य, ममत्वरहित, निरहंकारी असा महात्मा सर्व कामनांचा त्याग करून शान्तिस्वरूप जीवन्मुक्त स्थितीत राहतो. अशी पराशान्ती हे श्रीमंतीचे खरे लक्षण आहे. संतुष्टीशिवाय शान्ती येणे अशक्य असते. ही श्रीमंती जगावेगळी असते व त्या श्रीमंताला जगाचे स्वामित्व व अपार कीर्ती मिळते. तो म्हणतो –

"अहं वृक्षस्य रेरिवा । कीर्तिः पृष्ठं गिरेरिव ।
द्रविणं सवर्चसम् ।" (तैत्तिरीय १०)

–या संसारवृक्षाचा उच्छेद करण्याइतके माझे त्यावर स्वामित्व आहे. पर्वतशिखरांशी स्पर्धा करणारी कीर्ती मला आहे. तेजस्वी सोन्याचे मी भांडार आहे. 'मी'शी निगडित

शरीर व 'माझे'शी संबद्ध जग या संसारवृक्षाच्या पिंड-ब्रह्मांडरूप रचनेचा मी स्वामी आहे. त्यामुळे या अहं-ममच्या सर्व उलाढालींकडे मी तटस्थपणे पाहतो. त्यात घडणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या घटनांनी माझी संतुष्टता बिघडत नाही. कारण –'भोगमात्रसाम्यलिङ्गाच्च ।'(ब्रह्मसूत्र ४–४–२१) वेगळ्या संदर्भाने असले तरी हे सूत्र जीवन्मुक्ताची भोगांपासून असलेली अलिप्तता स्पष्टपणे निदर्शनाला आणून देते. त्यामुळे तो नित्यतृप्त असतो.

"जंव निरार्तता नाही । तंव संसार असे पाही ।
मग संतुष्टीचे ठायी । कुंठे सहजे ।।" (ज्ञानेश्वरी)

कामना असेपर्यंतच संसाराचा सत्यत्वाने, भोक्तृत्वाने व अनुकूल-प्रतिकूल असा अनुभव येतो. कामनालोप झाल्यावर आलेल्या संतुष्टतेमध्ये त्या संसाराच्या या स्वरूपाला तिलांजली मिळते. हाच भाव भगवान श्रीकृष्ण प्रसिद्ध शब्दांत सांगतात

"प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ।।"
(२–५५)

येथे संतुष्ट होण्याची कारणपरंपरा व प्रक्रिया मांडली आहे. मनात ठाण मांडून बसलेल्या सर्वकामनांचा त्याग केल्यानंतर आत्मभोगाने आत्मतृप्त होऊन संतुष्ट झालेला स्थितप्रज्ञ समजला जातो. त्याचे वर्णन आत्मक्रीड, आत्मरति अशा शब्दात श्रुती करते. 'यं लब्ध्वा पुमान् अमृतो भवति तृप्तो भवति ।' असे नारदभक्तिसूत्रात या संदर्भात म्हटले आहे.

जो पुरुषार्थविहीन आहे असा पुरुष जिवंत असून मेलेला असतो. धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांतील एकही पुरुषार्थ ज्याला साधत नाही त्याचे जीवन व्यर्थ आहे.

बहुतां जन्मांचा सेवट । नरदेह सांपडे अवचट ।
येथें वर्तावे चोखट । नीतिन्याये ।।
प्रपंच करावा नेमक । पहावा परमार्थ विवेक ।
जेणेकरितां उभयलोक । संतुष्ट होती ।। (दासबोध)

मनुष्यजन्म महाभाग्याने हाती आला असता अर्थकामरूप प्रपंच व धर्ममोक्षरूप परमार्थ पूर्ण केला पाहिजे. याच शरीराला क्रियमाणस्वातंत्र्य आहे. मानवेतर शरीरे अनिवार प्रारब्धाच्या भोगप्रवाहात अगतिकपणे त्या त्या योनीच्या अन्तापर्यन्त प्रवास करीत असतात. मानवाला मात्र अविद्या व अज्ञान यांचा त्याग करण्याचे स्वातंत्र्य असल्याने त्याला 'त्यागयोनी' असे म्हणतात. म्हणूनच माणूस तयार केल्यावर ईश्वराला धन्यता वाटली. तो म्हणाला –

'ताभ्यः पुरुषमानयत्ता अब्रुवन् सुकृतं बतेति ।
पुरुषो वाव सुकृतम् ।।' (ऐतरेय १–२–३)

– हे फार सुंदर शरीर तयार झाले. माणूस हीच सुंदर रचना आहे. त्या रचनेत धर्मापासून मोक्षापर्यन्त प्रवास करण्याची क्षमता आहे व तो त्याने केला पाहिजे. दासबोधातील पहिल्या दशकाच्या शेवटी यासंबंधी फार उद्‌बोधक विचार मांडले आहेत. ते मुळातूनच पाहावेत. आधुनिक कारखानदारीमध्ये कारखान्याची पूर्ण क्षमता वापरता आली नाही तर नुकसान होते. हाच विचार मानवरूप यंत्राच्या संदर्भात वापरण्यास हरकत नसावी. विश्वयंत्रामध्ये अशी योजना असू शकते हे पटल्यास ही क्षमता वापरणे निकडीचे ठरेल.

'अमृत' या संकल्पनेला आचार्यांनी वेगळीच कलाटणी दिली आहे. स्वर्गातील देवांचे पेय ही पौराणिक कल्पना व अज-अजर-अमर ही वेदांताची सरणी याहून हा विचार वेगळा आहे. 'सुखदा' हा शब्द स्वर्गसूचक आहे व निराशा हा अवस्थासूचक आहे. आशेमध्ये दुःख आहे हा याचा निष्कर्ष होतो. तीच नरकरूप असते. नाही ते मिळावे, आहे ते टिकावे, कमी आहे ते वाढावे, सर्वश्रेष्ठ असावे इत्यादी आशेची रूपे आहेत. यातून सहसा कोणीही सुटलेला नाही, गीता म्हणते –

आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ।
ईहन्ते कामभोगार्थमन्यायेनार्थसंचयान् ।। (१६–१२)

शेकडो प्रकारांच्या आशांनी जखडलेले, परिणामी कामक्रोधमय जीवन जगणारे, विषयभोगांच्या पूर्तीसाठी भ्रष्टाचारी मार्गाने धनसंचयाचा प्रयत्न करीत असतात. अशाप्रकारे पुढे वर्णन करून 'पतन्ति नरकेऽशुचौ' (१६–१६) असे त्याचे फळ सांगितले आहे. म्हणूनच आचार्य निराशेला अमृत म्हणतात. याहून अधिक प्रत्ययकारी वर्णन भर्तृहरीने केले आहे.

आशा नाम नदी मनोरथजला तृष्णातरंगाकुला
रागग्राहवती वितर्कविहगा धैर्यद्रुमध्वंसिनी ।
मोहावर्तसुदुस्तराऽतिगहना प्रोत्तुंगचिन्तातटी
तस्याः पारगता विशुद्धमनसो नन्दन्ति योगीश्वराः ।।

नदीचे नाव – आशा. नदीतील पाणी – मनोरथ. पाण्यावरील तरंग – तृष्णा. जलचर – राग-द्वेष. आश्रयाने राहणारे पक्षी – वितर्क (धर्मविरुद्ध). काठावरील प्रदेशाचा नाश – धैर्यरूप वृक्ष पाडते. भोवरे मोह. खोली – भयंकर. पात्र – पार होण्यास महाकठीण. नदीकाठ – उंच

उंच चिंतेचे डोंगर. पार कोण करू शकतो — शुद्धचित्त साधक. पार केल्याचे फळ — ब्रम्हानंदप्राप्ती. पार जाणाऱ्याची पदवी — योगीश्वर.

हे सर्व वर्णन अतिशय बोलके आहे. मनोरथ, तृष्णा, रागद्वेष, वितर्क, धैर्य नष्ट होणे, मोह, भयभीत जीवन, चिता हे सर्व आशेचे परिणाम आहेत. असे आयुष्य हाच नरक. आशारहित आयुष्य हाच स्वर्ग. उपनिषद वाङ्मयात प्रत्यक्ष साधनाचा विचार कमी असला तरी काम वा आशा यांचा विचार मात्र त्यात जरूर केलेला दिसतो. निष्कामता व अमृतत्व यांची सांगड काठकामध्ये घातली आहे. —

यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि श्रिताः।
अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रम्ह समश्नुते॥' (२—३—१४)

साधकाच्या सर्व कामना जेव्हा त्याच्या हृदयातून निघून जातात तेव्हा हा मरणधर्मा अमृत होतो. ब्रम्हानुभवी होतो.

(६)

**पाशो हि को यो ममताभिमानः**
**सम्मोहयत्येव सुरेव का स्त्री।**
**को वा महान्धो मदनातुरो यो**
**मृत्युश्च को वापयशः स्वकीयम् ॥६॥**

प्रश्न पाश कोणते आहेत?
उत्तर ममत्व व अभिमान.
प्रश्न दारूइतकेच मोहित करणारे काय आहे?
उत्तर स्त्री.
प्रश्न पूर्ण आंधळा कोण?
उत्तर कामातुर.
प्रश्न मृत्यू कोणता?
उत्तर स्वतःची अपकीर्ती.

शरीर, मन, बुद्धी, प्राण इत्यादी अनात्म पदार्थांवर 'मी'चा अध्यास व घर, पत्नी, नातलग, द्रव्य यांवर 'माझे'चा मोह हे माणसाला जखडून टाकणारे पाश आहेत. शरीरादी मी व गृहादी माझे प्रारब्धाधीन असल्याने अनिवार असतात. त्यामुळे हे पदार्थ असावे किंवा नसावे हा विचाराचा विषय होऊ शकत नाही त्यांचे पाश असू नयेत. या पाशात माणसाने स्वतःला अज्ञानाने जखडून घेतलेले असते. जे मिथ्या आहे ते सत्य आहे असे वाटणे हेच अज्ञान. त्यांचे बेमालूम झालेले एकत्रीकरण लक्षात घेऊन त्यांचा विवेक झाला की पाश नाहीसे होतात. शरीरादी मी व गृहादी माझे यांच्या व्यापारांना मी निमित्तमात्र आहे. 'असंगोऽयम् पुरुषः' ही श्रुती व 'निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्' ही स्मृती समन्वयपूर्वक पाहिली असता विवेकाचे स्वरूप कळून येते.

मदिरेने शुद्ध हारपली की वस्त्राचे व स्थलकालाचे सुद्धा भान राहत नाही. तसेच सुभाषितकार म्हणतात त्याप्रमाणे 'कामातुराणां न भयं न लज्जा' अशी परिस्थिती स्त्रीदर्शनानंतर अनिवार काम निर्माण झाला असता होते. येथे स्त्रीला दोष दिलेला नाही. स्त्रीजात बदनाम करण्याचा हेतू नाही. तर स्त्रीकडे पाहण्याच्या दृष्टीला दोष दिला आहे. स्त्रीच्या दृष्टीने हेच उत्तर 'पुरुष' असे होईल. असा मनुष्य आपण कोण आहोत, धर्म काय आहे, नीती काय सांगते, ही स्त्री परस्त्री आहे, अब्रू सांभाळावयाची असते, कुटुंबसंस्था सांभाळावी लागते इत्यादी गोष्टी पूर्णपणे नजरेआड करीत असल्याने त्यालाच पूर्ण आंधळा म्हटले आहे.

स्वतःची अपकीर्ती हाच मृत्यू हे उत्तर वाचल्याबरोबर 'संभावितस्य चाऽकीर्तिर्मरणादतिरिच्यते।' हे श्रीकृष्णवचन समोर येते. सभ्य गृहस्थाला आपली अपकीर्ती मरणाहून क्लेशकारक वाटते. यात व्यावहारिक विचाराबरोबरच आध्यात्मिक साधनेची पूर्वतयारी सुद्धा अभिप्रेत आहे. अपकीर्तीची कारणे बहुतेक वेळा नीतिमूल्यांना बाजूला सारण्यात असतात. ही मूल्ये जपली नाहीत तर अध्यात्माला अत्यावश्यक अशी चित्तशुद्धी होणार नाही; शमदमाच्या अभ्यासाशिवाय नैतिकता सांभाळणे अशक्य आहे. 'शमदमाद्युपेतः तेषामवश्यानुष्ठेयत्वात्' (ब्र. सू. ३—७—२७) म्हणून त्यांचे अवश्य अनुष्ठान केले पाहिजे.

**को वा गुरुर्यो हि हितोपदेष्टा**
**शिष्यस्तु को यो गुरुभक्त एव।**
**को दीर्घरोगो भव एव साधो**
**किमौषधं तस्य विचार एव॥७॥**

प्रश्न – गुरू कोण?
उत्तर – हिताचा उपदेश देणारा.
प्रश्न – शिष्य कोण?
उत्तर – गुरुभक्तच.
प्रश्न – जुनाट आजार कोणता?
उत्तर – भवरोग.
प्रश्न – त्यावर औषध कोणते?
उत्तर – विचार हेच एकमेव औषध.

श्रीगुरू ही एक संकल्पनात्मक संस्था आहे. परंपरा आहे. गुरुपद व गुरू ही व्यक्ती एकच असली तरी व्यक्तीपेक्षा पदाला अधिक महत्त्व आहे. त्या पदावरील व्यक्ती आपापल्या परंपरेप्रमाणे चालत आलेले तत्त्वज्ञान व साधना स्वानुभवातून शिष्यांना सांगतात. हा स्वानुभव गुरुपदाला व व्यक्तीला ब्रह्माएवढे मोठे करतो. हा मोठेपणा त्या पदावरील व्यक्तीच्या लौकिक वैभवावर, व्यक्तिमत्त्वावर, शिष्यसंख्येवर, ग्रंथसंपदेवर किंवा वक्तृत्वावर अवलंबून नसतो. या सर्व बाबी आनुषंगिक व काही मर्यादेपर्यन्त उपयुक्त असतात. त्या अनिवार्य नसतात. हे लक्षात न घेतल्याने गुरुसंस्थेविषयी समर्थक व विरोधक यांच्यात सारखेच गैरसमज आहेत. गुरू हिताचा उपदेश करतात. हे हित कोणते? येथेच फार मोठी गल्लत झालेली आहे. गोंधळ झालेला आहे. श्रीज्ञानदेवांच्या आरतीमध्ये 'हित नेणती कोणी। अवतार पांडुरंग नांव ठेविले ज्ञानी।' असे म्हटले आहे. आपले खरे व शाश्वत ~~हित कशात आहे हे कोणालाच कळत नाही. इहलोक व~~ त्यावरील लौकिक जीवन याचा इतका पगडा मानवी मनावर आहे की त्यापलीकडे तो विचारच करण्यास तयार नसतो. यमदेव म्हणतात –

न सांपरायः प्रतिभाति बालं
प्रमाद्यन्तं वित्तमोहेन मूढम्।
अयं लोको नास्ति पर इति मानी
पुनः पुनर्वशमापद्यते मे॥(कठ १-२-६)

– संपत्तीने व मोहाने मूढ झालेल्या या प्रमादशील बालबुद्धीच्या लोकांना या मृत्युलोकाशिवाय अन्य गतीचे भानच नसते. त्यामुळे ते पुन्हापुन्हा माझ्या कचाट्यात सापडतात.

या ऐहिक जीवनामध्ये निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी गुरूच्या चरणांवर लोळण घेणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. अशा शिष्यांना नादी लावून त्यांच्या हिताला व संप्रदायाच्या मूळ हेतूला सपशेल लोळविणाऱ्या गुरूंची संख्याही कमी नाही. खरे श्रीगुरू शिष्याच्या हितासाठी प्रथम समजावून सांगतात की –

भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम्।
व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते॥
(गीता २-४४)

– भोग व ऐश्वर्य यांची आसक्ती असणाऱ्यांच्या ठिकाणी निश्चयात्मक बुद्धी असत नाही.

त्या निश्चयात्मक बुद्धीने असा निश्चय केला पाहिजे की – न हि अध्रुवैः प्राप्यते हि ध्रुवं तत्॥(कठ १-२-१०) – अनित्य वस्तूंचा पाठलाग करून नित्यवस्तूची कधीच प्राप्ती होणार नाही. नित्य, शाश्वत व व्यापक वस्तू प्राप्त झाल्याशिवाय खरे समाधान मिळणे शक्य नाही. म्हणून अशा वस्तूच्या प्राप्तीत माझे खरे हित आहे. ~~ती वस्तू~~

एको देवः सर्वभूतेषु गूढः
सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा।
कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः
साक्षी चेता केवलो निर्गुणश्च॥(श्वेता ६-११)

– सर्व भूतांमध्ये गुप्तरूपाने राहणारी, अनंतकोटी ब्रह्मांडांना व्यापून अपार उरलेली, सर्वभूतांमध्ये अन्तरात्म्याच्या रूपाने असणारी, सर्व कर्मे जिच्या सत्तेवर होतात अशी, सर्व भूते जिच्यात सामावलेली आहेत अशी, सर्वसाक्षी, सर्वांना चेतना देणारी, अत्यंत निर्मल व निर्गुण असली पाहिजे. या एकमेव हितकारक वस्तूच्या प्राप्तीसाठी मार्गदर्शन करणारे श्रीगुरू असतात. या मार्गदर्शनावर, वस्तूवर व त्या प्राप्तीच्या साधनावर निष्ठा ठेवणारा तोच खरा शिष्य! तोच खरा गुरुभक्त !!

रोग-अरोग-आरोग्य अशा क्रमाने आरोग्य ही सहजावस्था सिद्ध होते. ही नैसर्गिक स्थिती आहे. जेव्हा शरीराच्या कोणत्याही अवयवाचे सातत्याने भान होत राहते तेव्हा तो अवयव बिघडला असण्याची मोठीच शक्यता असते. उदा. आपल्या डोक्याचे आपणांस भान नसते, पण ते दुखू लागताच त्याचे भान होऊ लागते. त्याचप्रमाणे या भवाचा हा सर्व पसारा वास्तविक ब्रह्मरूप आहे व ते ब्रह्म मी आहे. त्यामुळे त्याचे भान होऊच नये! पण मी, देह, जग, सुख-दुःख इ. प्रकारचे भान सतत होत असल्याने हा रोगच मानला पाहिजे. हा रोग कर्करोगाप्रमाणे अखेरच्या अवस्थेला जाईपर्यन्त लक्षात येत नाही व बहुधा त्या रोगाने मरण (व जन्म) आल्यानंतरही तो कळत नाही. मी देह आहे, जग सत्य आहे, मी कर्ता व भोक्ता आहे, जग भोग्य आहे ही या भवरोगाची मुख्य लक्षणे आहेत. कामक्रोधादी सहा लक्षणे आहेत. हा रोग अनादी असल्याने अत्यंत जुनाट क्रॉनिक (chronic)असा आहे. वरील सर्व प्रकारचा अविचार टाकून उपनिषदांनी दिलेला विचार स्वीकारणे हे त्यावरील मुख्य औषध आहे. ते म्हणजे "असत् वा इदमग्र आसीत्" (तैत्ति. २-७) हे क्षराक्षररूप जगत् प्रथम अव्यक्तात लीन होऊन राहिलेले होते. त्यातून ते पुढे व्यक्त झाले. त्यामुळे ती अव्यक्तातील अवस्था हीच मूळ भवाची अवस्था आहे. त्यांत दृश्य भेद यत्किंचितही नाही. या जड अव्यक्त तत्त्वाला चेतन ब्रह्माचे अधिष्ठान असतेच असते. कारण अध्यस्तरूप अव्यक्त अधिष्ठानाशिवाय असू शकत नाही. ते अधिष्ठान मी आहे. असा परोपरीने साधनपूर्वक विचार केल्याने भवरोगापासून मोक्ष मिळतो. तीर्थ, व्रते, पूजन, ~~भजन, तप इ. सहकारी साधने आहेत.~~

(८)

**किं भूषणात् भूषणमस्ति शीलं**
**तीर्थं परं किं स्वमनो विशुद्धम्।**
**किमत्र हेयं कनकं च कान्ता**
**श्राव्यं सदा किं गुरुवेदवाक्यम्॥८॥**

प्रश्न – भूषणांमध्ये भूषण कोणते?
उत्तर – शील.
प्रश्न – सर्वश्रेष्ठ तीर्थ कोणते?
उत्तर – स्वतःचे शुद्ध अन्तःकरण.
प्रश्न – या जगात त्याज्य कोण आहे?
उत्तर – सुवर्ण व स्त्री.
प्रश्न – नेहमी ऐकावे असे काय आहे?
उत्तर – वेद व गुरुवाक्य.

'शीलं परं भूषणम्' हे सुभाषित प्रत्येक सुसंस्कृत माणसाच्या मनात ठसलेले असते. शील म्हणजे चारित्र्य. शुद्ध चरित्राचा तो शीलवान. 'शुद्ध आचार, विचार व उच्चार यांतून ते साकार होते. ही शुद्धता मनमानी नसून तिचे निकष पूर्वसूरींनी निश्चित केले आहेत. 'जनी वंद्य ते सर्वभावे करावे' ही शिकवण त्या निकषांना धरून केलेली आहे. 'बरे सत्य बोला यथातथ्य चाला' हा बाळबोध वळणाचा श्लोक तेच सांगतो. शील प्रामुख्याने लैंगिक आयुष्याच्या शुद्धतेवर तोलले जाते व ते योग्यच आहे. त्यानंतर संपत्ती 'अलक्ष्मी' व 'अनपगामिनी' यांपैकी कोणती आहे याला महत्त्व आहे. ती वाईट मार्गाने आलेली नसावी व वाईट मार्गाने जाणारी नसावी. नंतर धर्मशील, आतिथ्यशील इत्यादी प्रकारे. 'शील' ही संकल्पना समोर येते. हे शील अन्तःकरण शुद्ध असेल तरच सांभाळता येते हे उघडच आहे. म्हणूनच अन्तःकरणाला श्रेष्ठ तीर्थ म्हटले आहे. संपत्ती व स्त्री यांच्याभोवती शील ही कल्पना बांधलेली असल्याने त्यांचा त्याग शीलरक्षण सोपे करतो. प्रश्नोत्तरीला शुद्ध अध्यात्माचा गहिरा रंग आहे हे लक्षात घेऊनच येथे शीलाचा विचार केला पाहिजे. प्रत्यक्ष संन्यास हा शब्द न उच्चारता तोच येथे सुचविला आहे. पुढील प्रश्नाचे उत्तर हेच सुचविते. वेद व गुरुवाक्य याशिवाय ऐकण्यासारखे काहीच नाही. हे उत्तर आत्मचिंतनाशिवाय काहीच करू नये असे सांगते.

(९)

**के हेतवो ब्रह्मगतेस्तु सन्ति**
**~~सत्संगतिर्दानविचारतोषाः~~ ।**

**के सन्ति सन्तोऽखिलवीतरागा**

**अपास्तमोहाः शिवतत्त्वनिष्ठाः ॥९॥**

प्रश्न — ब्रह्मज्ञानाची साधने कोणती ?

उत्तर — सत्संग, दान, आत्मविचार व संतोष.

प्रश्न — सन्त कोणाला म्हणावे ?

उत्तर — जो नष्टमोह व आत्मनिष्ठ असेल त्याला.

तीर्थस्थ दैवत, सद्‌ग्रंथ, भगवन्नाम, मुमुक्षू व श्रीगुरू हे सत्संगाचे टप्पे आहेत. सर्व संतांनी एकमुखाने सत्संगाचे अपार महत्त्व जागोजागी सांगितले आहे. सत्संगतीने कोणते वैभव प्रगट होते ते गीतेच्या शेवटच्या श्लोकात पाहावे.

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।

तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम॥

कृष्णाच्या सत्संगतीत अर्जुनाला श्री, विजय, वैभव व नीती यांची प्राप्ती झाली. सात्त्विक दानाने चित्तशुद्धी होते. 'सत्त्वं सुखे संजयति', 'सत्त्वात् संजायते ज्ञानम्', 'सात्त्विकस्याहुः — सात्त्विकं निर्मलं फलम्', 'ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्थाः इ. प्रकारे गीतेत सत्त्वगुणाचे माहात्म्य वर्णिले आहे. दान हे त्यागसूचक व म्हणून वैराग्यसूचक ठरते. दान हा त्रैवर्णिकांचा धर्मही आहे. धर्माचरणाने चित्तशुद्धी होते. संतुष्ट अन्तःकरण सामान्य व्यावहारिक जीवनात सुद्धा समाधान देते. तो व्यवहार नीटसपणे करण्यास मदत करते. स्थूल व्यवहार करण्यास जर हा संतोष इतका उपयुक्त आहे तर अत्यंत सूक्ष्म साधना करण्यासाठी तो संतोष किती उपयुक्त व अनिवार्य असेल ! 'ठेविले अनंते तैसेचि राहावे। चित्ती असो द्यावे समाधान' या वृत्तीने राहिले तरच हा संतोष टिकून राहू शकतो. या संतोषी मनःस्थितीमध्ये धारणा, ध्यान, नामस्मरण, सोहंसाधना इत्यादी फलदायी होऊ शकतात. आत्मविचार हे साधन सुद्धा संतुष्ट मनोवृत्तीशिवाय होणे शक्य नाही. जीव आत्मा आहे व आत्मा ब्रह्म आहे हे या विचाराचे स्वरूप आहे.

'यथोदकं शुद्धे शुद्धमासिक्तं तादृगेव भवति।' (कठ २-१-१५) या काठकश्रुतीमध्ये दोन शुद्ध जलांच्या दृष्टान्ताने हा आत्मविचार खूप सोपा केला आहे. पावसाचे शुद्ध पाणी पावसाच्या पाण्यानेच साठलेल्या शुद्ध पाण्याच्या तलावात पडावे त्याप्रमाणे अविद्याउपाधी असलेले चेतनतत्त्व निरुपाधिक चेतनतत्त्वाशी एकरूप होते. मोहनिवृत्ती झाल्याशिवाय अशा प्रकारचा निश्चय होणे महाकठीण आहे.

यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति।

तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च॥

(गीता. २-५२)

— ज्या वेळी बुद्धी मोहरूपी चिखलातून बाहेर पडेल तेव्हा तिला ठाऊक असलेल्या व ठाऊक करून घेण्यासारख्या सर्व गोष्टींबाबत वैराग्य निर्माण होते. या गोष्टींबद्दल कुतूहल व अपेक्षा हाच मोह ! असा मोह गेल्यावर —

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः।

वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते॥ (गीता २-५६)

— जो दुःखाने संतप्त होत नाही व सुखाची इच्छा करीत नाही, तो राग-भय-क्रोधरहित स्थिर बुद्धीचा संत जाणावा.

(१०)

**को वा ज्वरः प्राणभृतां हि चिन्ता**

**मूर्खोऽस्ति को यस्तु विवेकहीनः।**

**कार्या प्रिया का शिवविष्णुभक्तिः**

**किं जीवनं दोषविवर्जितं यत्॥१०॥**

प्रश्न — प्राण्यांना चढणारा ज्वर कोणता ?

उत्तर — चिन्ता.

प्रश्न — मूर्ख कोण ?

उत्तर — विवेकहीन.

प्रश्न — प्रिय कार्य कोणते ?

उत्तर — शिवाची व विष्णूची भक्ती.

प्रश्न — जीवन कशाला म्हणावे ?

उत्तर — जे निर्दोष आहे ते.

'स्वयं भवति यद्यथा भवति तत्तथा नान्यथा।' (वैराग्यशतक ६२) — जे जसे होणार असते ते तसेच आपण होऊन होते; दुसऱ्या प्रकारे होत नाही. हे ज्याला कळत नाही किंवा स्वीकारता येत नाही त्याला चिंतेने दाह होत जातो. जे जसे घडते त्याची पूर्वतयारी ते ज्याच्यासंबंधी घडते त्यानेच करून ठेवलेली असते. हा अनिवार प्रारब्धाचा विवेक ज्याच्याजवळ नसतो तोच मूर्ख. कर्तृत्वाच्या अविवेकानेसुद्धा मूर्खत्व येते ते असे —

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः ।

अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते॥ (गीता ३-२७)

— सर्व कर्मे प्रकृतीच्या त्या त्या गुणांकडून केली जातात. मी (किंवा तो) त्यांचा कर्ता आहे असे अहंकाराने मूढ झाल्याने वाटते. यातूनच चिंतेचा जन्म होतो. हे निश्चित असल्याने प्रत्यक्ष कर्तृत्वपूर्वक करण्यासारखी व क्रियमाणस्वातंत्र्यात ~~करण्याची एकच बाब उरते व ती म्हणजे शिवाची~~ किंवा

विष्णूची भक्ती ! तीच माझे प्रिय करणारी आहे. माझे खरे प्रिय काय आहे ? –

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्।
भवामि नचिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम्॥ (गीता १२-७)

त्या भगवंताचे ठिकाणी चित्त समर्पित केले असता तो मला लवकरच मृत्यरूप संसारातून तारून नेईल. हे घडण्यासाठी माझे जीवन मात्र त्याला आवडेल असे निर्मळ असले पाहिजे. त्याची दिशा प्रश्नोपनिषदात दाखविली आहे – "ते एते ह ब्रह्मपराः ब्रह्मनिष्ठाः परं ब्रह्मान्वेषमाणाः॥" (प्रथम प्रश्न) – ते वेदांचा अभ्यास करणारे, वेदांच्या आज्ञेप्रमाणे वागणारे व आत्मानुसंधानात रमणारे असे होते. असे न वागणे हेच सदोष जीवन होय.

(११)

**विद्या हि का ब्रह्मगतिप्रदा या**
**बोधो हि को यस्तु विमुक्तिहेतुः।**
**को लाभ आत्मावगमो हि यो वै**
**जितं जगत् केन मनो हि येन॥११॥**

प्रश्न – विद्या कशाला म्हणावे ?
उत्तर – ब्रह्म प्राप्त करून देणारीला.
प्रश्न – बोध कोणता ?
उत्तर – मोक्ष मिळवून देतो तो.
प्रश्न – लाभ कोणता ?
उत्तर – आत्मप्राप्ती हाच.
प्रश्न – जग कोणी जिंकले ?
उत्तर – ज्याने मन जिंकले त्याने.

शौनकाने अंगिरसाला प्रश्न विचारला – "कस्मिन्नु भगवो विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवति।" (मुंडक १-१ ३) – काय जाणले असता हे सर्व जाणल्यासारखे होते ? असे तत्त्व सांगणारी विद्या तीच खरी विद्या. ही जाणली नाही तर 'ततः किं ततः किं'ला उत्तरे देता देता आयुष्य संपून जाईल ! अंगिरस म्हणतात – "अथ परा या तदक्षरमधिगम्यते।" (मुंडक १-१-५) – जिने अविनाशी परब्रह्म जाणले जाते ती परा विद्याच खरी विद्या होय. "तस्य भासा सर्वमिदं विभाति।' – जिच्या प्रकाशण्यामुळे हे सर्व भासमान होते ती सर्ववित् जिच्यामुळे जाणली जाते तीच विद्या. ही विद्या जो बोध करून देते तोच खरा बोध. प्रत्येक बोध जेव्हा आत्मवस्तूच दाखवतो तेव्हा त्याला खरा बोध असे नाव देतात. "प्रतिबोधविदितं मतममृतत्वं हि विन्दते॥ (केन २-४)– प्रत्येक बोध जेव्हा आत्मरूप होतो तेव्हा त्याला मोक्ष असे नाव मिळते. ह्याला आचार्य खरा लाभ असे म्हणतात. जो झाल्यानंतर दुसरे काहीच मिळविण्यासारखे राहत नाही.

यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः।
यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते॥
(गीता ६-२२)

– जो स्थिर झाला असता भयंकर दुःखदायक काही घडले तरी चित्तवृत्ती अस्थिर होत नाही. अशी अवस्था ज्याला प्राप्त झाली आहे त्याने मनावर पूर्ण नियंत्रण मिळविलेले असते. जगाचा कसाही आघात झाला तरी ज्याला काहीच बरेवाईट वाटत नाही तो खरा जगज्जेता मानला पाहिजे. जग जिंकणारा जगाच्या नावाने विव्हळत असेल तर जगाने त्याला जिंकले असेच म्हटले पाहिजे. तो जगज्जेता म्हणतो. "अहं विश्वं भुवनमभ्यभवाऽम्।" (तैत्ति. ३-१०) – मी सर्व ब्रह्मांडाला तुच्छ मानतो !

(१२)

**शूरान्महाशूरतमोऽस्ति को वा**
**मनोजबाणैर्व्यथितो न यस्तु।**
**प्राज्ञोऽथ धीरश्च समस्तु को वा**
**प्राप्तो न मोहं ललनाकटाक्षैः॥१२**

प्रश्न – शूरात शूर कोण ?
उत्तर – (मनसिज) मदनबाणांनी व्यथित न होणारा.
प्रश्न – बुद्धिमान, धैर्यवान व समदर्शी कोण ?
उत्तर – स्त्रियांच्या कटाक्षाने मोहित न होणारा.

सामान्य मनुष्यजीवनाचा काम हा स्थायीभाव आहे. त्याची शृंगाररसाकडे सहज प्रवृत्ती आहे. एरव्ही खचलेला, त्रासलेला, निराश झालेला नगण्य माणूस सुद्धा कामजीवनात अल्प का होईना, आनंद मिळवू शकतो. या प्रवाहाविरुद्ध जाण्यासाठी फार मोठे शौर्य लागते, धैर्य लागते. (श्लोक पांच पहावा)

**(क्रमशः)**